**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः27.10.2024** **वारः रविवार**

---

- पंतप्रधान मन की बात मधून आज देशपरदेशातील नागरिकांशी संवाद साधणार
- देशाचा अवकाश क्षेत्राला अत्युच्च पातळीवर नेण्यात इस्त्रोचं मोठं योगदान - राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांचे गौरवोद्गार
- 2035 पर्यन्त अंतराळात भारताचे स्वतःचे स्वतंत्र भारतीय अंतरिक्ष स्थानक
- दक्षिण आशियातील सर्वात मोठं प्रवेशद्वार मैत्री गेटचं अमित शहा यांच्या हस्ते आज उद्घाटन

आणि

- जागतिक टेबलटेनिस क्रमवारीत भारताच्या मनिका बात्राची पहिल्या आठमध्ये झेप

आता सविस्तर बातम्या

**<u>मन की बात-संध्या</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 115 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणीच्या आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित होईल.

**<u>राष्ट्रपती</u>**

भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्त्रोनं देशाच्या अवकाश क्षेत्राला अत्युच्च पातळीवर नेले असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल काढले. नवी दिल्ली इथं आयोजित सरदार पटेल

स्मृती व्याख्यानमालेत दुरस्थ पध्दतीनं संदेश देताना त्या बोलत होत्या. स्वातंत्र्यानंतर विविध संस्थानांचं राजकीय एकत्रीकरण करुन देशाला एकसंध करणारे सरदार पटेल हे आधुनिक भारताचे शिल्पकार असल्याचे त्या म्हणाल्या. स्टॅच्यू ऑफ युनिटी ही सरदार पटेल यांना योग्य श्रद्धांजली असल्याचंही राष्ट्रपतींनी नमूद केलं.

ISRO चे अध्यक्ष, डॉ. एस. सोमनाथ यांनीही या व्याख्यानमालेत; नव्या क्षितीजाच्या शोधात भारतीय अवकाश क्षेत्राचा साहसी प्रवास; या विषयावर आपले विचार मांडले. भारत पुढील 10 वर्षात जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेतील आपलं योगदान 10 टक्क्यांपर्यंत वाढवण्याची अपेक्षा आहे. असं त्यांनी सांगितलं. सध्या जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेत भारताचं योगदान केवळ २ टक्के आहे आणि ते वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**<u>जितेंद्र सिंग</u>**

2035 पर्यन्त अंतराळात भारताचं स्वतः चे स्वतंत्र भारतीय अंतरिक्ष स्थानक उभारण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी काल केली. यासंदर्भात काल नवी दिल्लीत भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रो आणि जैवतंत्रज्ञान विभाग यांच्यात झालेल्या सामंज्यस्य करार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

या करारामुळे भारतीय विज्ञान संशोधन क्षेत्रात नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे. या काराराद्वारे अंतरिक्ष स्थानकाच्या उभारणीबरोबरच बायो ई -3 हे धोरण राबवण्यात येणार असून , यामध्ये अर्थव्यवस्था , पर्यावरण आणि रोजगार या तीन क्षेत्रात जैव तंत्रज्ञानाचा वापर करून नावीन्यपूर्ण संशोधन करता येणार आहे. खाजगी आणि सरकारी भागीदारी तून भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्राची वेगाने प्रगती होत असून , भारतातील अंतराळ क्षेत्रात स्टार्ट अपची संख्या 300 झाली आहे. असंही जितेंद्र सिंग यावेळी बोलताना म्हणाले.

## अमित शहा

भारत बांग्लादेश सीमेलगत पश्चिम बंगालमधील पेट्रापोल या बंदरावर बांधलेल्या प्रवासी टर्मिनल इमारतीचं आणि 'मैत्री द्वार' या कार्गो गेटचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज होणार आहे. या कार्यक्रमासाठी काल रात्री ते कोलकाता इथं पोहोचले आहेत. भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांतील नागरिकांसाठी आंतरराष्ट्रीय व्यापार आणि दळणवळण सुविधा सुलभ करण्यासाठी या इमारतीची निर्मिती करण्यात आली आहे. दोन देशातील व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राला चालना देणारं २४ उत्तर परगणा जिल्ह्यात स्थित हे दक्षिण आशियातील सर्वात मोठं प्रवेशद्वार आहे. भारत आणि बांग्लादेशदरम्यानचा ७० टक्के व्यापार या भागातून होतो. त्यानंतर अमित शहा हुगळी जिल्ह्यातील आरामबाग इथं सहकार विभागातर्फे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहतील. तसंच कोलकाता इथं भाजपाच्या वतीनं आयोजित कार्यक्रमातही सहभागी होतील.

## स्पेन

स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेट्रो सँचेझ आजपासून ३ दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. गेल्या १८ वर्षातील स्पेनच्या राष्ट्राध्याक्षांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं निवेदनाद्वारे दिली आहे. याआधी पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष सांचेझ यांची बहुपक्षीय बैठकांच्या निमित्ताने अनेकदा भेट झाली आहे. या भेटीदरम्यान अध्यक्ष सांचेझ पंतप्रधान मोदींसमवेत शिष्टमंडळ स्तरावर चर्चा करतील. मेक एन इंडिया अभियानाअंतर्गत टाटा अडव्हांस सिस्टिम आणि स्पेनच्या एअरबस स्पेन या कंपनीनं संयुक्तपणे उभारलेल्या सी २९५ विमानाच्या फायनल असेंब्ली लाईन प्रकल्पाचं उद्घाटन वडोदरा इथं दोन्ही नेत्यांच्या हस्ते होणार आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे राष्ट्रपती सांचेझ यांची भेट घेणार आहेत. तसंच व्यापार आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि तज्ज्ञांची मुंबईत भेट घेणार आहेत. द्विपक्षीय सहकार्याला चालना देण्यासाठी विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

## <u>निवडणूक</u>

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्ष आपापल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करत आहेत. भारतीय जनता पक्षानं काल २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. प्रमुख उमेदवारांमध्ये नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे, गडचिरोली विधानसभा क्षेत्रातून डॉक्टर मिलिंद नरोटे तर वाशिममध्ये श्याम खोडे यांना उमेदवारी मिळाली आहे. पुण्यातील कसब्यात हेमंत रासने तर पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातून सुनील कांबळे आणि खडकवासल्यात भीमराव तापकीर यांना उमेदवारी मिळाली आहे. कॉंग्रेसनं काल दोन याद्या जाहीर केल्या.

पहिल्या यादीत भुसावळमधून राजेश मानवतकर, नागपूर दक्षिणमधून गिरिश पांडव, पुढच्या यादीत कॉंग्रेसतर्फे गडचिरोलीमध्ये मनोहर पोरेटी, नांदेड दक्षिणमध्ये मोहनराव अंबाडे, तर वांद्रे पश्चिममध्ये आसिफ झकेरिया यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानंही काल २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. यात माळशिरसमधून उत्तम जानकर, अकोले इथून अमित भांगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पुण्यातील पर्वती मधून अश्विनी कदम तर खडकवासल्यातून सचिन दोडके यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे १८ उमेदवारांची घोषणा काल झाली. धुळ्यातून अनिल गोटे, हिंगोलीतून रूपाली पाटील, भायखळ्यातून मनोज जामसुतकर रिंगणात आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही १५ उमेदवारांची पुढची यादी काल जाहीर केली यात पनवेलमधून योगश चिले. अक्कलकोटमधून मल्लिनाथ पाटील, तर सोलापूर शहर मध्य नागेश पासकंटी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.\

## <u>इराण</u>

इराणमधील सिस्तान आणि बलुचिस्तान भागांत काल झालेल्या दहशतवादी हल्ल्यात १० पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती इराणच्या पोलीस सुत्रांनी दिली. ताफतान काऊंटी परिसरात आपले कर्तव्य बजावल्यानंतर तळावर परत येत असलेल्या ताफ्यावर हा हल्ला झाला. आतापर्यंत

कोणत्याही गटानं या हल्ल्याची जबाबदारी स्विकारलेली नाही. गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या सीमाभाग असेलेल्या या परिसरांत दहशतवादी हल्ले होत आहेत.

**इस्त्रायल**

इस्त्रायलनं काल इराणवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात चार इराणी सैनिक मारले गेल्याची माहिती इराणच्या सैन्यदलानं दिली आहे. या महिन्याच्या सुरुवातीला इराणनं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याला प्रत्यत्तर म्हणून इस्रायलनं काल हल्ला केला. तेहरान, खुजेस्तान आणि इलाम प्रांतातील क्षेपणास्त्र निर्मिती सुविधा आणि इतर ठिकाणांवर सुमारे 20 ठिकाणी कारवाई केली असल्याचं इस्त्रायलनं सांगितलं.

**ESI**

कर्मचारी राज्य विमा (ESI) योजनेत यावर्षी ऑगस्टमध्ये सुमारे 20 लाख नवीन कामगारांनी नोंदणी केली आहे,  अशी माहिती कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या निवेदनात देण्यात आली आहे, यामध्ये 9 लाख 89 हजार कर्मचारी 25 वर्षांखालील वयोगटातील आहेत. याच महिन्यात महिला सदस्य संख्येमध्ये 4 लाख14 हजाराची  वाढ झाली आहे. याशिवाय 28 हजार 917 नवीन आस्थापना ईएसआय योजनेच्या कक्षेत जोडण्यात आल्या आहेत , अशी माहितीही मंत्रायलयानं दिली आहे.

**बोट**

आसाममधील धुब्री जिल्ह्यात कौनबारी भागातील टिपकाई नदीत काल संध्याकाळी एक बोट उलटल्याचं वृत्त आहे. ३० नागरिक या बोटीतून प्रवास करत होते. एक लहान बालक बेपत्ता असून सविस्तर वृत्ताची प्रतिक्षा आहे.

आरबीआय

भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांना काल अमेरिकेतील ग्लोबल फायनान्स मासिकानं सर्वोच्च सेंट्रल बँकर म्हणून स्थान दिलं आहे. दास यांनी सलग दुसऱ्या वर्षी जागतिक स्तरावर सर्वोच्च सन्मान मिळवला आहे.

**मनिका-**

फ्रांसमध्ये सुरु असलेल्या माँटेपेलिअर जागतिक टेबलटेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मनिका बात्रा हिनं ऐतिहासिक कामगिरी केली असून जागतिक क्रमवारीत पहिल्या आठ स्थानावर झेप घेतली आहे. जागतिक क्रमवारीत पहिल्या आठमध्ये समावेश असलेली ती पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या क्विआन टियानवी कडून मनिकाला पराभव पत्करावा लागला असला तरी जागतिक क्रमवारीत तीनं वरच्या स्थानी झेप घेतली आहे.

**महिलाक्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंडच्या महिला संघांमध्ये मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज अहमदाबाद इथ होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी दीड वाजता हा सामना सुरू होईल.

या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतीय महिला संघाने न्यूझीलंडचा 59 धावांनी पराभव केला असून मालिकेत 1-0ने आघाडी घेतली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार